**"महाराष्ट्र वचनकोश ग्रंथप्रकल्प" या प्रकल्पास**
**प्रशासकीय मान्यता व खर्चास मंजूरी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : मसाअ १०११/ प्र.क्र.३२/ भाषा-३
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक - ६ जानेवारी, २०१२

**शासन निर्णय** :- डॉ अशोक केळकर यांनी प्रस्तावित केलेला "वचनकोश" हा ग्रंथ प्रचलित सुभाषित कोशापेक्षा वेगळा कोश आहे. पाश्चात्य दृष्टीकोनाचा अवलंब करुन या अभिनव वचनकोशाची निर्मिती करण्यात येणार आहे. मराठी भाषेच्या समृध्दीच्या अनुषंगाने "वचनकोश" हा ग्रंथ मोलाची भर टाकण्यास सक्षम आहे. तसेच सदर प्रकल्पाचे स्वरुप व कालावधी लक्षात घेता हा प्रकल्प डॉ केळकर यांच्याकडे सोपविण्यात येऊन सदर प्रकल्पाकरीता मानधनापोटी रुपये २,००,०००/- (रुपये दोन लक्ष फक्त) इतक्या खर्चास मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. विचारांती शासन, या शासन निर्णयान्वये "वचनकोश प्रकल्पाकरीता" रुपये २.०० लक्ष (रुपये दोन लक्ष फक्त) इतके अर्थसहाय्य करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे :-

(अ) वचनकोश प्रकल्पाच्या लेखनासाठी एक वर्षाची कालमर्यादा निश्चित करण्यात यावी.

(ब) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी प्रकल्पाच्या लेखनाबाबत डॉ.केळकर यांच्याबरोबर सामंजस्य करार करावा व कराराच्यावेळेस त्यांना नाममात्र मानधन देण्यात यावे व जसजसे लेखन मंडळाला प्राप्त होईल त्याप्रमाणे तसतशी मानधनाची रक्कम अदा करण्यात यावी.

(क) वचनकोश प्रकल्पांची मुद्रणप्रत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या ताब्यात आल्यानंतर छपाईसाठीचा योजनांतर्गत खर्च त्या त्या वर्षासाठी "३१ सहायक अनुदाने" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

(ड) "वचनकोश ग्रंथप्रकल्पा" करीता मंडळाकडून खर्च करण्यात आलेल्या रकमेचे विनियोग प्रमाणपत्र तात्काळ शासनास सादर करणे आवश्यक राहील.

३. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर प्रकल्पावर होणारा खर्च, मागणी क्रमांक झेडएफ- ०२, २२०५- कला व संस्कृती प्रचालन, (०१) राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (०२) (२२०५ ३२१४) ३१ - सहायक अनुदाने (वेतनेतर) योजनांतर्गत " या लेखाशिर्षाखाली संबंधित वित्तीय वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या मंजूर तरतूदीतून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-४, परिच्छेद-२७ (२) मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६३६०३८३३३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(ललिता शि. देठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र - १/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), मंुबई.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा) महाराष्ट्र , मुंबई,
७. वित्त विभाग, (व्यय - ४ / सेवा ५ / विनियम), मंत्रालय, मुंबई,,
८. निवड नस्ती (भाषा-३).